**आकाशवाणी पुणे**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**पुणे वृत्तांत**

**वेळ - संध्याकाळी 06.00 वा.**

**दिनांक- 13.09.2024 वार – शुक्रवार**

---

**कचरा प्रकल्प**

ओल्या कचऱ्यापासून सीएनजी तयार करण्यासाठीचा बाणेर-सूस रस्त्यावरचा प्रकल्प हटवण्याची गरज नाही असं स्पष्ट करत, सर्वोच्च न्यायालयाने याबाबतची याचिका निकाली काढली आहे. या कचरा प्रकल्पात शास्त्रोक्त पद्धतीने कचऱ्यावर प्रक्रिया करा, आजूबाजूच्या परिसरातील नागरिकांना या प्रकल्पाचा त्रास होऊ देऊ नका, योग्य ती काळजी घ्या, असे निर्देश सर्वोच्च न्यायालयाने पुणे महापालिकेला दिले आहेत. या प्रकल्पाविरोधात मंत्री चंद्रकांत पाटील, खासदार प्रा. डॉ. मेधा कुलकर्णी यांनी सातत्याने भूमिका मांडली होती. तसंच उपमुख्यमंत्री आणि पुण्याचे पालकमंत्री अजित पवार यांच्या पातळीवर हा प्रकल्प बंद करण्याविषयी चर्चा झाली होती.

**गणेश विसर्जन**

घरातील गौरी गणपतींना निरोप दिल्यानंतर आता पुण्यासह राज्यभरातील नागरिक पुण्याचा वैभवशाली सार्वजनिक गणेशोत्सव पाहण्यासाठी मध्यवर्ती भागात गर्दी करत आहेत. विविध मंडळांचे आकर्षक भव्य देखावे तसंच सामाजिक संदेश देणारे जिवंत देखावे पाहण्यासाठी संध्याकाळनंतर पुण्यात मोठी गर्दी दिसून येत आहे. दरम्यान येत्या मंगळवारी होणाऱ्या गणेश विसर्जनासाठी पिंपरी चिंचवड महापालिकेनं सर्व यंत्रणा सज्ज केली आहे. शहरातील प्रमुख गणेश विसर्जन घाटांवर महापालिकेच्या वतीने देण्यात येणाऱ्या सेवा सुविधांची आज संबंधित अधिकाऱ्यांनी पाहणी केली.

पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा करण्यासाठी महापालिकेने विविध क्षेत्रीय कार्यालयांच्या परिसरात 15 विघटन केंद्र तयार केले आहेत. या ठिकाणी जीवरक्षकांची नेमणूकही करण्यात आली आहे.

पुणे महानगरपालिकेनंही पर्यावरणपूरक गणेश विसर्जनासाठी सर्व स्तरांवरुन जय्यत तयारी केली आहे. नदी काठावरील विसर्जन घाटांची दुरुस्ती, लोखंडी टाक्या, निर्माल्य कलश, विसर्जन हौद, कचरा वाहतूक व्यवस्थेचे नियोजन याबरोबरच सार्वजनिक स्वच्छता, औषधोपचाराची व्यवस्था, आणि विविध ठिकाणी जीवरक्षकांची नियुक्तीही करण्यात आली आहे.

**सायकल फेरी**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा येत्या 17 तारखेला वाढदिवस आहे, या निमित्त पुण्यात आज सायकल फेरी आयोजित करण्यात आली होती. कोथरूडमधील छत्रपती शिवाजी महाराज पुतळ्यापासून डेक्कन इथल्या धर्मवीर संभाजी महाराज पुतळ्यापर्यंत ही सायकल फेरी काढण्यात आली. जवळपास अडीच हजार सायकलपटूंनी यात सहभागी होत, 'सायकल चालवा'चा नारा दिला आणि शारीरिक स्वास्थ्य तसंच पर्यावरण रक्षणाचा संदेशही दिला. खासदार प्रा. डॉ. मेधा कुलकर्णी यांनी या उपक्रमासाठी पुढाकार घेतला होता. केंद्रीय क्रीडा राज्यमंत्री रक्षा खडसे यांनी हिरवा झेंडा दाखवून याचं उद्घाटन केलं. पंतप्रधानांनी 'फिट इंडिया'साठी नेहमीच प्रोत्साहन दिलं आहे. सुदृढ आरोग्यासाठी सायकल चालवण महत्त्वाचं आहे, असं खडसे म्हणाल्या.

**सचिनखिलारे**

महाराष्ट्राचा सुपुत्र सचिन खिलारी याने पॅरिस पॅरा-ऑलिम्पिकमध्ये पुरुषांच्या गोळा फेक प्रकारात रौप्य पदक पटकावत इतिहास रचला. तो मूळचा सांगलीचा आहे. पॅरा-ऑलिम्पिकमध्ये मोठं यश मिळवल्यानंतर सचिन आज पुण्यात दाखल झाला; त्यावेळी त्याचं धुमधडाक्यात स्वागत करण्यात आलं. विविध ठिकाणी सचिनचे सत्कार समारंभ आयोजित करण्यात आले होते.

**महत्वाची सूचना**

हिंदी राजभाषा दिनानिमित्त केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांचा विशेष संदेश उद्या सकाळी सात वाजून दहा मिनिटांनी आकाशवाणीवरून प्रसारित करण्यात येणार आहे. त्यामुळे उद्या,

शनिवारी आकाशवाणीच्या पुणे केंद्रावरून प्रसारित होणारं प्रादेशिक बातमीपत्र सकाळी सात वाजून दहा मिनिटांऐवजी पावणे सात वाजता प्रसारित केलं जाईल.

**एसटी**

राज्य परिवहन महामंडळाने पुणे विभागाला नव्या 215 गाड्या देण्याचा निर्णय घेतला आहे. येत्या ऑक्टोबर महिन्यात म्हणजेच दिवाळीपूर्वी  एसटीच्या ताफ्यात या बस दाखल होणार आहेत. पुणे विभागात सध्या 815 बस आहेत. आता नवीन बस आल्यानंतर एकंदर एक हजार 25 बस पुणे, मुंबईसह अन्य मार्गांवर धावणार आहेत.

**संप**

राज्य शासनाने मोटार वाहन विभागासाठी 23 सप्टेंबर 2022 रोजी सुधारीत आकृतिबंधाचा शासन निर्णय जारी केला आहे. हा शासन निर्णय जारी होऊन दोन वर्ष झाली तरी या आकृतिबंधाच्या अंमलबजावणीसाठी शासन स्तरावर कोणतीही ठोस कार्यवाही होत नाही; असा आरोप राज्यातील मोटार वाहन विभागातील कर्मचा-यांनी केला आहे. आपल्या या प्रलंबित मागणीसाठी येत्या २४ सप्टेंबरपासून बेमुदत संपावर जाणार असल्याचा इशारा मोटार वाहन विभाग कर्मचारी संघटनेचे सरचिटणीस सुरेंद्र सरतापे यांनी दिला आहे.

**क्रीडा**

पुण्यात 19 वर्षाखालील गटासाठी मान्सुन करंडक आंतरक्लब टी-20 क्रिकेट स्पर्धा सुरू आहेत. यात क्रिकेट नेक्स्ट ॲकॅडमीने ननावरे स्पोटर्स फाऊंडेशनचा 7 गडी राखून पराभव केला. अन्य दुसऱ्या सामन्यात सेन्चुरी क्रिकेट ॲकॅडमीने ननावरे स्पोटर्स फाऊंडेशनचा 9 गडी राखून सहज पराभव केला.

**हवामान**

पुणे आणि परिसरात आज कमाल तापमान 29 तर किमान तापमान 19 पूर्णांक 9 दशांश अंश सेल्सियस नोंदवलं गेलं. उद्याही साधारण असंच तापमान असेल, तसंच पावसाच्या हलक्या सरी देखील अपेक्षित आहेत, असं पुणे वेधशाळेनं म्हटलं आहे.

हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.